OUR HERITAGE
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

# "उस्मानाबाद शहरातील निजामकालीन वाड्यांची सामाजिक ऐक्यामधील भूमिका : संक्षिप्त आढावा"

**प्रा.डॉ.जयश्री रमेश कुलकर्णी (देशमुख)**
संशोधक
इतिहास विभागप्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद
संपर्क: 9673487711 ई-मेल : jayshree.jayant@gmail.com

**प्रस्तावना :-**

आधुनिक भारताच्या इतिहासातील भीष्मपर्व म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढा आणि या लढ्याचा उत्तररंग म्हणजे मराठवाडा/हैद्राबाद मुक्तीसंग्राम! स्वातंत्र्योत्तर भारतात संस्थानांचे विलीनीकरण होत असताना हैद्राबादच्या निजामशाही/आकसफजाहीविरोधी जो संग्राम झाला, त्यामध्ये मराठवाड्यातील उस्मानाबाद शहराचे स्थान खूप वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

हैद्राबादच्या निजामापासून मुक्त होऊन महाराष्ट्रात संमिलीत होण्यासाठी मराठवाड्याने एक प्रदीर्घ मुक्ती लढा लढविला. या लढ्यात राजकीय पातळीबरोबरच सामाजिक, आर्थिक, न्यायिक, धार्मिक तसेच सांस्कृतिक पातळीवरही उस्मानाबाद शहराने वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

उस्मानाबाद शहर हे महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा या प्रादेशिक विभागात असून पश्चिम महाराष्ट्राच्या सीमेवर स्थित आहे. भोगावती नदीच्या काठी वसलेल्या या जिल्ह्याच्या ठिकाणाचे मूळ नाव धाराशिव असून ते १८.१८६०६६, ७६.००४१९३९ रेखांश-अक्षांशावर वसलेले आहे.

**संशोधन पध्दती :**

शोधलेखनासाठी क्षेत्रभेटी व सर्वेक्षण, मुलाखती, संदर्भसाधने व संदर्भ ग्रंथांचा वापर करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) उस्मानाबाद शहरातील निजामकालीन वाड्यांची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
२) या वाड्यांची मराठवाडा मुक्तीसंग्रामातील भूमिका अभ्यासणे.
३) उस्मानाबाद शहरातील वाड्यांची समकालीन सामाजिक ऐक्यामधील भूमिका अभ्यासणे.

**विषय मांडणी :**

इ.स.१७२४ ते १९४८ या कालावधीत हैद्राबादच्या निजामशाहीची सत्ता आंध्र, कर्नाटक राज्यांच्या काही भागात व महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या काही भागात अस्तित्वात होती. निजामाच्या जुलमी राजवटीचा वरवंटा अव्याहतपणे सुमारे दोनशे वर्षे या प्रदेशावर फिरत होता. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात इत्तेहादूल मुस्लिमीन व रझाकार या संघटनांनी या प्रदेशात निजाम सत्तेच्या पाठींब्याने हिंदू जनतेचा अतोनात छळ केला. कासिम रझवीने इत्तेहादूलला अत्यंत भडक, प्रखर अशा अतिरेकी संघटनेचे स्वरूप प्राप्त करून दिले आणि प्रयत्नपूर्वक सक्रिय, शिस्तबध्द अशा 'रझाकार' संघटनेची जोड त्याला दिली.[1] रझाकार संघटनेने हिंदूंवर जुलूम, लुटालूट, हत्या विशेषतः स्त्रियांवर अनन्वित अत्याचार असे सत्र आरंभिले. तेव्हा निजामाच्या संस्थानात जागोजागी त्याला विरोध करण्यासाठी संघटित प्रयत्न झाले. मराठवाड्यातील उस्मानाबाद शहरातील जनतेनेही असाच स्वसंरक्षणार्थ लढा येथील ऐतिहासिक वाड्यांच्या आश्रयाने दिला.

**वाड्यांची पूर्वपीठिका :**

भारतीय स्थापत्याचे साधारणतः दोन प्रकार पडतात. १)धार्मिक स्थापत्य २) इतर स्थापत्य. मानवासाठी उपयुक्त पडेल असे जे स्थापत्य असते, ते इतर स्थापत्यामध्ये मोडते. उदा.किल्ले, प्रशासकीय इमारती, गढ्या-वाडे, राजवाडे व इतर[2] यापैकी गढीवाडे हे श्रीमंत सरदार, जहागिरदारांनी बांधलेले आढळतात. तर स्थानिक प्रशासक वर्ग, सधन वर्गाने आपल्या निवासस्थानासाठी व इतर उद्देशासाठी मोठमोठे वाडे बांधलेले दिसतात. अगदी प्राचीन काळापासून या संदर्भातील माहिती पहावयास मिळते. तर वाडा बांधणी, त्यासाठीचे भूमी परीक्षण व माती तयार करण्याच्या तंत्राची माहिती समरांगण, सूत्रधार, माणसार, बृहत्संहिता, बाणभट्टाची कादंबरी, अपराजित पृच्छा, हयशिर्ष, पाश्चरात्र, राजवल्लभ, शिल्पदीपक, अग्नि व मत्स्य पुराणासारख्या संस्कृत ग्रंथांमधून पहावयास मिळते.[3] तर मध्ययुगीन वाड्यांचे प्रकार, बांधणी या संदर्भातील माहिती समरांगणसूत्र सारख्या मध्ययुगीन वास्तुशास्त्रासंबंधित ग्रंथातून मिळते.[4]

**उस्मानाबादमधील वाडे : स्वरुप व वेगळेपण :**

सामान्यतः मध्ययुगीन गढी/वाडे हे तत्कालीन समाजातील उच्चभ्रू सरदार, सरंजामदार, सावकार इत्यादींनी बांधलेले व कार्यालय, निवासस्थान व अन्य दैनंदिन व्यवहारासाठी वापरलेले दिसतात.[5] वाड्यांची साधारण रचना ही भक्कम, कलात्मक, दर्शनी/दिंडी दरवाजा, सभोवती भक्कम दगड-मातीतील भव्य संरक्षक भिंत, प्रवेशद्वाराच्या आत उंच जोत्यावर ओसरी, एक किंवा अनेक चौक, चौकात पाणीसाठे, पुढे दालने, माजघर, स्वयंपाकघर, परसदार अशी रचना असते.[6] बहुधा सगळ्या वाड्यांमध्ये पाण्यासाठी आतच आड असते. धान्याची बळद असते. एक मजल्यापासून सात मजल्यापर्यंतचे वाडे मध्ययुगात आढळतात. उस्मानाबाद शहरातील वाडे काही

प्रमाणात असेच दिसत असले तरी त्यांचे स्वतःचे हिंदू मुस्लिम मिश्र शैलीचे असे वेगळेपण आहे. या वाड्यांच्या प्रवेशद्वाराच्या आतील वरच्या बाजूस शस्त्रास्त्रे लपवून ठेवण्यासाठी रुंद असे कोनाडे आहेत. अशाच गुप्त जागा आणि वाटा परसदारी पण आहेत. भिंतीमधील जिना दिसू नये म्हणून त्याला फडताळासारखे दरवाजे आहेत. प्रत्येक घराच्या तळघराचे दरवाजे गुप्त आहेत. स्त्रीयांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सर्व सोयी वाड्यातच आहेत. शिवाय पाणवठ्याद्वारे काही दगाफटका होऊ नये म्हणून तेही सहज दिसणार नाही असे ओसरीच्या मध्यभागी वगैरे झाकलेले आहेत. काही वेळा जोड वाड्यांच्या मध्यभागी गुप्त व रुंद जिने आहेत. प्रत्येक वाड्याच्यावर एक टेहाळणीची जागा असून तिचा तसेच तळघरे वा लादण्यांचा वापर अन्नधान्य साठा, गुप्त बैठका, लपण्याची जागा अशा विविध कारणासाठी होत असावा. या वाड्यांच्या बांधणीचे वेगळेपण म्हणजे त्याच्या तटबंदीच्या भिंती ओबडधोबड असून निम्म्यापर्यंत दगडी व वरच्या भागात मातीच्या भेंड्यांनी बांधलेल्या, वर निमुळत्या होत गेलेल्या आहेत. मुख्य दरवाजा वरील भागात अतिशय अरुंद व जाळीदार गवाक्ष आहेत. वाड्याच्या बाह्य भिंतींच्या खिडक्या खूप उंचावर, रुंद पण अगदी छताच्या जवळ असून त्या आतील बाजूस उतरत्या आहेत. म्हणजे तेथून भरपूर हवा व प्रकाश आत तर यावा पण बाहेरच्या व्यक्तीस आतले काही दिसू नये.

**सामाजिक ऐक्यातील भूमिका :**

उस्मानाबादमध्ये निजामकालीन फिरते न्यायालय केंद्र असल्याने येथे वकिल वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास होता आणि हा वर्ग अतिशय सधनही होता. त्यामुळे येथील बहुतेक वाडे वकिलांनी बांधलेले आहेत. त्यांच्याकडे वास्तव्यास येणाऱ्या ग्रामीण भागातील अशिलांच्या निवासासाठी वाड्यांच्या बाहेरील किंवा वरच्या मजल्यावरील भागात स्वतंत्र व्यवस्था केलेली दिसते. त्यामध्ये निवासखोल्या, पाण्याची सोय, स्वच्छतागृहे इ.बांधकामे दिसतात. यावरून त्याकाळात जातीसंरचना ही अगदी कर्मठ असली तरी ग्रामीण भागातून येणाऱ्या अशीलाची जात-धर्म-पंथ बाजूला ठेवून त्याची सोय करण्याची संस्कृती येथे आढळते. बहुतेक सर्व वाडे हिंदू आणि विशेषतः ब्राह्मण वकिलांचे आहेत आणि त्यांच्याकडे स्वातंत्र्योत्तर भारतीय कायदेग्रंथाबरोबरच निजामकालीन उर्दू कायदेग्रंथही जतन केलेले आहेत. खरोसकर, दानवे, देशपांडे, भोसरीकर, जिंतूरकर, ठोंबरे, पाटील यांचे वाडे आजही वकिलीचा हा वारसा जपताना दिसतात.[7] या व्यतिरिक्त बाबुराव कुलकर्णी आणि मैराण यांचे वाडे सावकारीसाठी प्रसिध्द असून त्यांच्याकडच्या काही चालीरिती, जाती-धर्म ऐक्याचे प्रतिक वाटतात. उदा. कुलकर्णी घराण्याची कुंभाराकडील पहिला गणपती घेण्याचा मान, तांबोळी यांच्याकडून पूजेचे साहित्य घेण्याची पध्दती, कुलकर्ण्यांकडील पिराला दिवा लावण्याचा मान ख्वाजा शमसुद्दीन गाझींच्या दर्ग्याला दिवा किंवा चंदन लावण्याचा, अन्नदानाचा हिंदू घराण्यांचा मान, हिंदूच्या सणाला मुस्लिम घराण्यांकडून कुंकू,

पान-सुपाऱ्या बांगड्या घेण्याची परंपरा.[8] हे सारे सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याची साक्ष देतात. राज्यकर्ते व त्यांच्या जाती-धर्मविषयक अत्याचारी धोरणाचा परिणाम सामान्य माणसांच्या जीवनावर न होऊ देता सांस्कृतिक, सामाजिक, समयोजन, सौदार्ह राखण्यामध्ये या वाड्यांची व तेथील लोकप्रतिनिधींची भूमिका लक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण वाटते. रझाकाराच्या काळातही येथील सामान्य प्रजा गुण्यागोविंदाने नांदत होती, असे दिसते.

उस्मानाबाद जिल्ह्यात याकाळात हिंदू-मुस्लिम-जैन-बौध्द धर्मीय लोकांबरोबरच जिल्ह्याबाहेरून तसेच तेलंगणामधून आलेल्या स्थलांतरीतांची संख्याही बरीच असल्याने धार्मिक व प्रादेशिक चालीरितींचे मिश्रण येथे झालेले दिसते. स्वातंत्र्य लढ्याच्या काळापासून ख्रिश्चन व शीख धर्मियांचीही यामध्ये वर्णी लागलेली दिसते.[9] मात्र त्यामुळे शहरातील एकसंध जनजीवनाला बाधा आलेली दिसत नाही.

**सारांश :**

उस्मानाबाद शहरातील निजामकालीन (१७-१८ वे शतक) वाड्यांचे वेगळेपण त्यांच्या वास्तूशैलीपुरतेच मर्यादीत नसून हे वाडे येथील सामाजिक-सांस्कृतिक ऐक्याचे, मराठवाडा मुक्तिसंग्रामातील नेतृत्वाचे तसेच स्वातंत्र्योत्तर राजकीय नेतृत्वाचे प्रतिक आहेत. या वाड्यांच्या स्थापत्य/बांधकाम शैलीपासून ते दैनंदिन रीतीरिवाजापर्यंत सर्वत्र सामाजिक समरसता प्रतिबिंबीत होताना दिसते. या वाड्यांच्या संदर्भातील बरीच उर्दू, मोडी कागदपत्रे, दप्तरे, त्या-त्या वारसदारांकडे व जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असूनही अद्याप या वाड्यांवर पुरेसे संशोधन झालेले नाही. ते झाल्यास उस्मानाबादच्या स्थानिक इतिहासावर आणखीन प्रकाश टाकणे शक्य होईल.

**संदर्भ सूची :**

1) हेमकांत महामुनी- मझा महान मराठवाडा - प्रकाशक : गोरख भोरे, उस्मानाबाद-२०११ प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.५९
2) प्रा.डॉ.शुभांगना अत्रे, रायरीकर, केंजळे - महाराष्ट्र संस्कृती- डयमंड पब्लिकेशन, पुणे २००८, प्रथमावृत्ती-पृष्ठ क्र.९८
3) प्रा.जयश्री कुलकर्णी - "उस्मानाबाद शहरातील निजामकालीन वाड्यांमधील वास्तुशैलीचे उपयुक्त पैलू" लघुशोध प्रकल्प-२०१० पृष्ठ क्र.२
4) डॉ.दिलीप बिराजदार - 'मराठवाड्यातील गढी/वाडे : एक वास्तुशास्त्रीय अभ्यास' शोधप्रबंध, स्वामीरामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - २०१५, प्रकरण १ पृष्ठ क्र.१०
5) कित्ता
6) कित्ता

OUR HERITAGE
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

7) प्रा.जयश्री कुलकर्णी - "उस्मानाबाद शहरातील निजामकालीन वाड्यांमधील वास्तुशैलीचे उपयुक्त पैलू" लघुशोध प्रकल्प-२०१० पृष्ठ क्र.१७
8) कित्ता
9) संकलक : के.के.शर्मा - संपादक : के.जी.पठाण, मंग्नाळे - संदर्भ महाराष्ट्र संच ५, खंड ४- इंटलेक्च्युअल बुक ब्युरो, भोपाळ-२००५, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.१३०४